| | |
|---|---|
| MHSN110001222011 | नियमित दिवाणी दावा क्र.२८/२०११<br>सचिन साळुंखे / निवृत्ती साळुंखे |

**<u>निशाणी १३७ खालील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांच्यामार्फत प्रतिवादी क्र.१क हे मयत झाल्याने त्यांच्याबाबत दावा अवसान पावल्याने तसे रद्दबातल करुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी असे नमूद केले आहे की, सदर कामातील प्रतिवादी क्र.१क हे दिनांक ३१/१२/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. परंतु वादी यांनी सदरचे वारस रेकॉर्डवर न घेतल्यामुळे त्यांचेविरुध्द दावा अबेट झाला आहे. वादी हे व्यवसाय व नोकरीनिमित्त परगावी असल्यामुळे त्यांना मुदतीत वारस रेकॉर्डवर घेता आले नाहीत. त्यामुळे, प्रतिवादी क्र.१क हे मयत झाल्याने त्यांच्याबाबत दावा अवसान पावल्याने तसे रद्दबातल करुन मिळावे यासाठी प्रस्तुतचा अर्ज देण्यात आलेला आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे देवून असे नमूद केले आहे की, सदरचा अर्ज मान्य व कबूल नाही. अर्जासोबत कोणताही पुरावा नाही. सबब, अर्ज नामंजूर करावा अशी मागणी त्यांनी केलेली आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. उभय पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र.१क हे मयत झाल्याने त्यांच्याबाबत

दावा अवसान पावला आहे. प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी दाखल करण्यात आलेला आहे. अशा प्रकारच्या दाव्यात मयत पक्षकार यांचे वारस अभिलेवर असणे दाव्याच्या अंतिम निराकरणासाठी आवश्यक आहे. असे न केल्यास विनाकारण गुंतागुंत वाढून प्रकरणांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे, सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. मयत प्रतिवादी क्र.१क यांचेबाबत दाव्याचे झालेले अवसान रद्दबातल करण्यात येते.

ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2025.07.19 17:05:58 +0530

आटपाडी. (अ. जो. बाचुळकर)

दिनांक : १९/०७/२०२५ दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

आटपाडी

*****

## CERTIFICATE

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mr. Ketan Ashok Sargar, (Grade-III) |
| Court | : | Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Atpadi |
| Date | : | 19/07/2025 |
| Order signed by the Presiding Officer | : | 19/07/2025 |
| Order uploaded on | : | 19/07/2025 |